डॉ. के. एस. पवार
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,
मुरगूड, जि. कोल्हापूर

.....

1. व्यावसायिक पर्यावरण

(Business Environment)

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व कमी होऊन इतर व्यवसायांचे महत्त्व वाढत आहे. त्यांचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्साही वाढत आहे. आधुनिक व्यवसाय अत्यंत गुंतागुंतीचे असतात. त्यासाठी व्यवसायिक पर्यावरणाची योग्य माहिती असणे आवश्यक आहे. व्यवसायावर अनेक अंतर्गत व बाह्य घटकांचा परिणाम होत असतो.

व्यावसायिक पर्यावरणाची संकल्पना (Concept)

मूळ फ्रेंच शब्द Environ पासून इंग्रजीत Environment हा शब्द अस्तित्वात आला आहे. एखाद्याच्या वर्तणुकीवर व विकासावर परिणाम करणारी आणि कारणीभूत ठरणारी भौतिक परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय.

व्यावसायिक पर्यावरणात व्यवसायावर परिणाम करणाऱ्या सर्व घटकांचा समावेश होतो

व्याख्या-

१. विल्यम एफ. थ्रेक- "व्यवसायिक पर्यावरणात उद्योगसंस्थेच्या बाहेरील घटकांचा समावेश असतो, जे घटक उद्योगसंस्थेला सुसंधीकडे किंवा धोक्याकडे घेऊन जातात. यामध्ये आर्थिक, सरकारी, कायदेशीर, बाजार आणि स्पर्धा, पुरवठादार, तंत्रज्ञान विषयक, भोगोलिक आणि सामाजिक घटकांचा समावेश होतो".

२. रिचमन आणि कोपेन- "पर्यावणात काही नियंत्रण व दबाव घटकांचा समावेश असतो. जे सामान्य व्यक्तीच्या किंवा व्यवस्थापनाच्या नियंत्रणाच्या कक्षेबाहेर असतात. हे घटक व्यवसायाचे महत्वाचे दाता असतात. त्यांच्या अस्तित्वाच्या कक्षेतच व्यावसायाला कार्य करावे लागते. हे घटक प्रत्येक देशातील बदलत्या परिस्थितीनुसार बदलतात."

व्यवसायिक पर्यावरणाचे घटक-

(Components of of business environment)

व्यावासायिक पर्यावरणाच्या घटकांचे अंतर्गत पर्यावरण व बाह्य पर्यावरण असे दोन गटात वर्गीकरण केले जाते.

व्यवसायिक पर्यावरणाचे घटक पुढील प्रमाणे आहेत.

अ) अंतर्गत पर्यावरण (Internal Environment)- अंतर्गत घटकांवर उद्योगसंस्थेचे यश अवलंबून असते. अंतर्गत घटक हे उद्योगसंस्थेच्या नियंत्रणात असतात. यामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

1. मूल्य पद्धत- संस्थापकांनी स्वीकारलेली मुल्य पद्धत उद्योगांना मार्गदर्शन करण्यासाठी महत्त्वाची असते. जी व्यवसायाची निवड

करण्यास मदत करते. ते संघटनेचे जीवित कार्य आणि उद्दिष्ट असते. उदा. जे. आर. डी. टाटा यांची मूल्य पद्धती. ते उपभोक्ते, कर्मचारी, भागधारक, संस्था व लोक यांची सामाजिक व नैतिक जबाबदारी मानतात. तर मुरुगप्पा ग्रुपने विकत घेतलेला दारू व्यवसाय या ग्रुपच्या मूल्यपद्धतीत उचित ठरत नाही. तसेच भारतातील इन्फोसिसचे कार्य जागतिक पातळीवर चांगला व्यवहार म्हणून मान्य केले आहे

2. जीवित कार्य आणि उद्दिष्टे- उद्योगसंस्थेच्या व्यवसायाचे कार्यक्षेत्र हे अग्रक्रम, विकासाची दिशा, व्यावसायिक तत्वज्ञान, व्यावसायिक धोरण इ.वर अवलंबून असते. जे उद्योगसंस्थेच्या जीवित कार्याचे व उद्दिष्टांनी मार्गदर्शन केले जाते.

३. व्यवस्थापकीय रचना आणि स्वरूप- व्यवस्थापकीय रचना म्हणजे संचालक मंडळ, व्यवसायिक मर्यादा हे महत्वाचे घटक व्यवसायिक निर्णयावर परिणाम करतात. काही निर्णय घेण्यास विलंब करतात तर काही त्वरित निर्णय घेण्याची सुविधा देतात. संचालक मंडळ हे निर्णय घेणारे सर्वोच्च मंडळ असते. कंपनीच्या विकासाकरिता आणि कार्यक्षमतेकरिता संचालक मंडळाचा दर्जा हा निर्णायक घटक ठरतो. काही कंपन्यांमध्ये उच्च दर्जाची व जबाबदारीची संचालक मंडळ आहेत तर काही कंपन्यांमध्ये त्यांच्या दर्जावर नियंत्रण नसते.

४. अंतर्गत अधिकार संबंध- कर्मचारी, भागधारक यांचा विविध पातळीवरील भक्कम पाठिंबा त्यामुळे उच्च व्यवस्थापनाचा फायदा मिळतो. संचालक मंडळाच्या निर्णयावर आणि अंमलबजावणीवर त्याचा महत्त्वाचा परिणाम होतो म्हणून संचालक मंडळाचे सदस्य, मुख्य

कार्यकारी संचालक आणि मंडळ यातील योग्य संबंध हा महत्त्वाचा घटक असतो.

५. कंपनीची प्रतिमा व नावलौकिक - भांडवल उभारणीसाठी कंपनीची प्रतिमा व नावलौकिक महत्त्वाचा असतो. कंपनीचे संघटन, बाजार मध्यस्थांची सांगड, खरेदी-विक्री करारात प्रवेश, नवीन उत्पादनाच्या उपक्रमांची सुरुवात यावर कंपनीची प्रतिमा महत्त्वाची ठरते.

६. भौतिक मालमत्ता व सुविधा- उत्पादनक्षमता, तंत्रज्ञान व उत्पादन सामग्रीची कार्यक्षमता, वितरण रचना इत्यादी घटक उद्योगसंस्थेच्या स्पर्धात्मकतेवर परिणाम करतात. उत्पादनाचा दर्जा हा महत्त्वाचा घटक असतो.

७. संशोधन व विकास आणि तंत्रविषयक कार्यक्षमता- संशोधन व विकास आणि तंत्रविषयक कार्यक्षमता यामुळे कंपनीची नवनिर्मितीची व स्पर्धा करण्याची क्षमता निश्चित होते.

८. मानवी साधनसंपत्ती- कौशल्य, दर्जा, मानसिक धैर्य, जबाबदारी, कल इ. गोष्टी मानवी साधनसंपत्तीची वैशिष्ट्ये आहेत. जी संघटनेचे सामर्थ्य वाढविण्यास किंवा दुबळेपणाला हातभार लावण्यात मदत करतात. काही संघटना कर्मचाऱ्यांमुळे संस्थेची पुनर्रचना, आधुनिकीकरण करण्यात अपयशी ठरल्या आहेत. विविध पातळीवरील लोकांचा समावेश, सहकार्य, प्रेरणा इ . गोष्टी बाबत प्रत्येक संघटनेत फरक असतो.

९. बाजार विषयक कार्यक्षमता-बाजाराकरिता उद्योगसंस्थेमध्ये बाजाराचे ज्ञान असणारे तज्ञ असावे लागतात. उद्योगसंस्थेचा नावलौकिक व वितरणाचे जाळे बाजार कार्यक्षमतेवर प्रत्यक्ष परिणाम करते.

१०. वित्तीय घटक- उद्योगसंस्थेचे वित्तीय धोरण, वित्तीयस्थिती, भांडवल रचना हे घटक अंतर्गत पर्यावरणात महत्त्वाचे असतात. त्यांचा व्यावसायीक कार्यक्षमता, व्युहरचना व निर्णय यावर परिणाम होते .

बाह्य पर्यावरण (External Environment)

बाह्य घटक हे कंपनीच्या नियंत्रणाबाहेर असतात. बाह्य घटक म्हणजे आर्थिक घटक सामाजिक व सांस्कृतिक घटक सरकारी व कायदेशीर घटक, लोकसंख्याशास्त्र विषय घटक, भौतिक घटक इ. हे घटक अनियंत्रित असतात. काही बाह्य घटकांचा उद्योगसंस्थेवर प्रत्यक्ष परिणाम होतो. या घटकांचे वर्गीकरण सूक्ष्म पर्यावरण आणि स्थूल पर्यावरण असे केले जाते.

सूक्ष्म पर्यावरण (Micro Economics)

सूक्ष्म पर्यावरणातील घटकांचा उद्योगसंस्थेच्या क्रियांवर प्रत्यक्ष कार्यक्षमतेवर परिणाम होतो. यामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

1. ग्राहक- व्यवसायाचे प्रमुख कार्य म्हणजे ग्राहकांची निर्मिती करणे व ते दीर्घकाळ टिकवून ठेवणे. ग्राहकामुळेच व्यवसाय अस्तित्वात येतो. व्यवसायांकडे विविध वर्गातील ग्राहक असतात. उदा. व्यक्तिगत, कौटुंबिक, उद्योगधंदे, व्यापारीसंस्था, सरकार इ. कोणत्याही व्यवसायाला एखाद्या ग्राहकावर अवलंबून राहणे धोकादायक असते. म्हणून ग्राहकांमध्ये विविधता असावी अन्यथा उद्योग बंद पडण्याची शक्यता असते.

2. पुरवठादार- सूक्ष्म पर्यावरणातील हा एक महत्त्वाचा घटक आहे. जो कंपनीला कच्चामाल व उत्पादन घटक पुरवितो. व्यवसायाचे उत्पादनाचे कार्य अखंडितपणे चालण्यासाठी उत्पादन साधनसामुग्रीचा

योग्य व नियमित पुरवठा महत्त्वाचा असतो. म्हणून कंपनीने एकाच पुरवठादारावर अवलंबून न राहता त्यामध्ये विविधता असावी.

3. स्पर्धा- संस्थेच्या स्पर्धकांमध्ये बाजारातील तसलेच उत्पादन करणाऱ्या इतर उद्योग संस्थांचा समावेश होतो असे नाही तर उपभोक्त्याला आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या इतर कंपन्यांचा ही समावेश होतो. उदा. टी.व्ही. उत्पादक कंपनीला दुसरी टी.व्ही. उत्पादन करणारी कंपनी स्पर्धक नसते तर दुचाकी, फ्रिज असे इतर उत्पादक संस्था याही स्पर्धक असतात.

4. जनता- जनता म्हणजे कोणताही गट की त्याचे हित साधण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष किंवा संघटनात्मक क्षमतेवर ते आघात करतात. त्याचा अनेक वेळा कंपनीवर गंभीर परिणाम होतो. अनेक कंपन्यांवर स्थानिक जनतेचा परिणाम होतो. अनेक वेळा पर्यावरण प्रदूषणाचा मुद्दा उपस्थित केला जातो. त्यामुळे कंपनीला आपला कार्यक्रम स्थगित ठेवावा लागतो. पर्यावरण प्रदूषण नियंत्रणासाठी उपाय योजावे लागतात.

5. भांडवलदार- सूक्ष्म पर्यावरणाचा हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या क्षमतेवर उद्योगसंस्थेचे धोरण, व्यूहरचना दृष्टिकोन इत्यादी गोष्टी अवलंबून असतात.

६. विपणन मध्यस्थ- कंपनीच्या सूक्ष्म पर्यावरणात अनेक विपणन मध्यस्थांच्या समावेश असतो. यामध्ये विपणन एजंट, व्यापारी यांचा समावेश होतो. जे कंपनीला ग्राहक शोधण्यास मदत करतात. हे मध्यस्थ मालाची वाहतूक करणे, साठा करणे, वाटप करणे यासाठी उद्योगाला मदत करतात. तसेच जाहिरात कंपन्या, बाजार संशोधन

संस्था, मध्यस्थसंस्था, सल्लागार संस्था, मध्यस्थ यांचाही यामध्ये समावेश होतो.

ब) स्थूल पर्यावरण (Macro Environment)

स्थूल पर्यावरणात लोकसंख्या विषय घटक, आर्थिक, नैसर्गिक, तांत्रिक, राजकीय व सांस्कृतिक घटकांचा समावेश होतो. सूक्ष्म पर्यावरणापेक्षा स्थूल पर्यावरणातील घटक अधिक अनियंत्रित असतात. हे घटक पुढील प्रमाणे-

1. आर्थिक घटक- आर्थिक पर्यावरणात अर्थव्यवस्थेची रचना व स्वरूप अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या अवस्था, आर्थिक साधनसामग्री, उत्पन्नाची पातळी, उत्पन्न व मालमत्तेचे वितरण, आर्थिक धोरणे, जागतिक संबंध यांचा समावेश होतो.

2. सामाजिक व सांस्कृतिक घटक- व्यवसाय हा समाजाचा अंतर्गत भाग असल्याने ते एकमेकांवर परिणाम करतात. व्यवसायाची सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे, संस्कृती व सांस्कृतिक पर्यावरणाचा व्यवसायावर परिणाम होतो. कामगारांचा दृष्टिकोन कामगार व व्यवस्थापन संबंध, सरकार आणि व्यवसाय संबंध, राजकीय तत्त्वज्ञान, कायदेशीर पर्यावरण, व्यावसायिक नीतिमत्ता, शासकीय धोरणे इत्यादीचा परिणाम होतो.

3. लोकसंख्या विषयक घटक- लोकसंख्याविषयक घटकामध्ये लोकसंख्येचे आकारमान, लोकसंख्या वाढीचा दर, वयाची रचना, कुटुंबाचे आकारमान, आयुर्मर्यादा, उत्पन्न पातळी, धर्म, जाती व्यवस्था इत्यादींचा समावेश होतो. प्रत्येक देशातील लोकसंख्या पर्यावरण वेगवेगळे असते. ते वेगवेगळ्या ठिकाणी भिन्न स्वरूपाचे असते.

त्यामुळे कंपन्यांना वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे व्यूहरचना करावी लागते.

4. राजकीय किंवा सरकारी घटक- व्यवसायाच्या राजकीय पर्यावरणात देशांतर्गत व विदेशी दोन्ही घटकांचा परिणाम होतो. राजकीय पक्षांची वैशिष्ट्ये-धोरणे, घटना, सरकारी पद्धती यांचा समावेश होतो. तर सरकारी पर्यावरणात आर्थिक धोरणे, व्यवसायिक धोरणे, नियमने यांचा समावेश होतो. प्रत्येक अर्थव्यवस्थेत सरकार कार्यात्मक भूमिका पार पडते. त्यात बाजार अर्थव्यवस्थेचा समावेश असतो. सरकारच्या कार्याचे वर्गीकरण विविध प्रकारे केले जाते. यामध्ये सरकारची मूलभूत कार्ये, मध्यस्थ कार्ये, कार्यक्षमता विषयक कार्ये यांचा समावेश होतो. याबरोबरच सरकारची उपक्रमात्मक भूमिका, नियोजन भूमिका, रचनात्मक भूमिका हे घटकही महत्त्वाचे असतात. अलीकडे जागतिक बदलानुसार शक्तीचे व जबाबदारीचे विकेंद्रीकरण होत आहे. त्यामुळे औद्योगिक विकासातील मध्यवर्ती सरकारची भूमिका कमी होत आहे.

5. नैसर्गिक घटक- नैसर्गिक पर्यावरण म्हणजे व्यावसायिकाने अंतिम सामग्री व सहाय्य यासाठी वापरलेली प्रत्येक गोष्ट होय. यामध्ये कच्चामाल, ऊर्जा सामग्री, उद्योगाचे आयुर्मान, वाया जाणारी सामग्री यांचा समावेश होतो. नैसर्गिक पर्यावरणाने समाजातील कार्य कसे चालते व उद्योग संस्था कशा कार्य करतात हे निश्चित होते. नैसर्गिक घटकात नैसर्गिक साधनसामग्रीची विपुलता, हवामान, प्रादेशिक रचना, जागतिक स्थिती, स्थाननिश्चिती, बंदर सुविधा, इत्यादीचा समावेश होतो. या भौगोलिक व परिस्थिती घटकांचा उद्योगसंस्थानच्या स्थाननिश्चितीवर परिणाम होतो. उदा. साखर

कारखाने ऊस उत्पादन क्षेत्राच्या जवळ स्थापन केले जातात. तसेच हवामानाचा ही स्थाननिश्चितीवर परिणाम होतो. उदा. कापड उद्योग, उत्पादनावर हवामानाचा परिणाम होतो. उन्हाळ्यात ए.सी. व कुलरची मागणी वाढते तर हिवाळ्यात स्वेटर व हिटरची मागणी वाढते.

6. तंत्रविद्याविषयक घटक- तंत्रज्ञानामध्ये फक्त वस्तू व वस्तूंच्या अस्तित्वातील उत्पादन व विभाजन चालू ठेवणे किंवा त्यात सुधारणा करणे एवढेच समाविष्ट नसते तर उपक्रमशीलता, कौशल्य व व्यवसाय तंत्रज्ञान यांचाही समावेश होतो. तंत्रज्ञान विकासामुळे उद्योगसंस्थेच्या कार्यक्षमतेत सुधारणा घडून येते.

अलीकडे माहिती तंत्रज्ञानाने विपणन व वित्तीय बाजाराचे स्वरूप बदलत आहे. स्पर्धात्मक लाभ मिळत आहेत. संशोधन, विकास आणि नवीनता यामुळे फायदे प्राप्त होत आहे. अनेक कंपन्या बाह्य तांत्रिक सामग्री घेऊ शकतात जसे संशोधन व विकास संघटन. सरकारी धोरणे, तंत्रज्ञान पर्यावरणासाठी महत्त्वाचे असते. विदेशी तंत्रज्ञानावरील नियंत्रण, उत्पादनाचे प्रमाण, तंत्रज्ञानाचा प्रकार याबाबत भारतीय व्यवसायावर खूप प्रतिकूल परिणाम झाला होता. परंतु उदारीकरणाने ही परिस्थिती सुधारली आहे.

7. जागतिक घटक- जागतिक घटकांचा देशांतर्गत व्यवसायांवर परिणाम होतो. उदा. जागतिक व्यापार संघटनेची तत्वे आणि करार, इतर राष्ट्रीय परिषद करार, जाहीरनामा, व्यवसाय अटी, देशातील प्रतिक्रिया इ. जागतिक व्यापार संघटनेची तत्वे आणि करार यांचा भारतीय व्यवसायांशी संबंध असतो. जागतिक व्यापार संघटनेने गुंतवणूक, उदारीकरणाचा कायदेशीर आदेश दिल्याने

भारतातील स्पर्धात्मक वातावरणात मोठा बदल झालेला आहे. दुसऱ्या देशातील आर्थिक परिस्थितीचा व्यवसायावर परिणाम होण्याची शक्यता असते. जर आंतरराष्ट्रीय बाजारातील आर्थिक अटी अनुकूल असतील तर निर्यातीस फायदा होतो. आंतरराष्ट्रीय राजकीय घटकांचा ही व्यवसायावर परिणाम होतो. उदा. युद्ध, आंतरराष्ट्रीय तणाव, राजकीय संबंध, लोकांचा तसेच परकीय लोकांचा दृष्टिकोण, आकांक्षा, चालीरीती, परंपरा, पसंती यांचा व्यवसायावर परिणाम होतो.

व्यावसायिक पर्यावरणाचे महत्व

(Importance of Business Environment)

1.संघटनात्मक बांधणी- कोणताही व्यवसाय यशस्वीपणे चालविण्यासाठी त्याच्याशी संबंधित पर्यावरणाचे ज्ञान असणे आवश्यक असते. कोणता व्यवसाय सुरु करावा त्यासाठी आवश्यक कच्चामाल, पुरेसा व स्वस्त श्रमिक वर्ग उपलब्ध आहे का? पाणी व व्यवसायाच्या प्रकारानुसार योग्य पर्यावरण आहे का? या सर्वांची संघटनात्मक बांधणी योग्यरीतीने केल्याशिवाय व्यवसाय यशस्वी येत नाही. तसेच व्यावसायिक पर्यावरण व व्यवसाय व्यवस्थापन यांचा जवळचा संबंध असतो.

2. व्यवसायाचे सुयोग्य नियोजन- व्यवसायाचे सुयोग्य नियोजन करण्यासाठी पर्यावरणाची पुरेशी माहिती असणे आवश्यक असते. माणसाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक नवीन व्यवसाय सुरु करावे लागतात. परिणामी जुने व्यवसाय बंद करून नवीन व्यवसायाचे नियोजन करावे लागते. उदा. गांधी टोपी. व्यावसायिकास बदलत्या परिस्थितीनुसार व बदलत्या मागणीनुसार

नवीन व्यवसायाचे नियोजन करावे लागते. त्यासाठी पर्यावरणाच्या सर्व घटकांची योग्य माहिती असावी लागते. कच्चामाल, भांडवल, श्रमपुरवठा, अर्थपुरवठा इ.

3. पर्यावरण नवीन ज्ञानशाखा- व्यवसाय यशस्वी होण्यासाठी पर्यावरण या नवीन ज्ञान शाखेची माहिती असणे आवश्यक आहे. विपणन पर्यावरण, संघटनात्मक पर्यावरण, खरेदी-विक्री पर्यावरण यांचा अनेक प्रगत देशात अभ्यास केला जातो. परिस्थितीनुसार बदलणारे पर्यावरण स्वीकारले नाही तर उद्योग स्पर्धा करू शकत नाही त्यामुळे उद्योग बंद पडण्याचा धोका असतो.

4. व्यवसायाचे सुस्पष्ट ज्ञान- पर्यावरणाच्या अभ्यासाने व्यावसायिकाला व्यवसायाचे योग्य प्रकारे व्यवस्थापन व नियोजन करता येते. व्यवसायावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करता येतो. म्हणून व्यवसायाचे अपयश व धोके टाळण्यासाठी पर्यावरणाचे ज्ञान आवश्यक असते.

5. योग्य धोरणासाठी- कोणताही व्यवसाय यशस्वीपणे चालविण्यासाठी योग्य धोरण आखणे आवश्यक असते. सतत अनेक नवीन व्यवसाय सुरू होत असतात. म्हणून व्यावसायिकाला सरकारी धोरण, जनता, इतर उद्योग, संघटक यांचा काय परिणाम होईल याचा विचार करावा लागतो. पर्यावरणाचा विचार न करता धोरण ठरविल्यास व्यवसाय बुडण्याची शक्यता असते.

6. व्यवसायाचे आव्हान स्वीकारणे- व्यवसायिक पर्यावरणाचे अभ्यासाने व्यावसायिकाला व्यवसायातील अनेक धोके व आव्हाने स्वीकारणे सोपे जाते. व्यावसायिकाला वर्तमान काळातील सुसंधी व धोक्याची जाणीव

होते. तंत्रज्ञानाच्या पर्यावरणाने भविष्यकालीन संधी व आव्हाने अभ्यासता येतात. भविष्यकालीन धोके ओळखता येतात त्याचा फायदा व्यवसायास होतो.

7. व्यवसायाचा विस्तार व विकास- व्यवसायाचा विस्तार व विकास अनेक पर्यावरणीय घटकांवर अवलंबून असतो. गतिमान अर्थव्यवस्थेत जुन्या वस्तूमध्ये नाविन्यता निर्माण करणे आवश्यक असते. त्यासाठी नवीन वस्तूंचे उत्पादन करणे आवश्यक असते. त्यामुळे उध्योगसंस्थेचा विस्तार व विकास होतो. नवनवीन तंत्रज्ञानाने व्यवसायात आमूलाग्र बदल घडवून आणता येतात. नवीन आव्हाने स्वीकारता येतात.

8. योग्य व्यूह रचना- कोणताही व्यवसाय यशस्वीपणे चालविण्यासाठी योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक असते. त्यासाठी पर्यावरणाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. पर्यावरण विश्लेषणाने व्यूहरचनेमध्ये बदल करता येतात.

९. प्रतिष्ठा प्राप्त होते- व्यवसायिक पर्यावरणाचा अभ्यास करून व्यवसायिक निर्णय घेणाऱ्या उद्योगसंस्थांना समाजामध्ये किंवा अर्थव्यवस्थेत प्रतिष्ठा प्राप्त होते. करण हे उद्योग परंपरा, संस्कृती, संस्कृतिक मुल्ये व नैसर्गिक पर्यावरण याचा विचार करून आपले व्यावसायिक निर्णय निश्चित करतात. त्यामुळे अशा व्यवसायांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते.

सरावासाठी प्रश्न-

अ) टीपा लिहा

१. व्यावसायिक पर्यावरण संकल्पना

२. अंतर्गत पर्यावरण

३. सूक्ष्म पर्यावरण

४. स्थूल पर्यावरण

५. व्यावसायिक पर्यावरणाचे महत्व

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१. व्यावसायिक पर्यावरण म्हणजे काय? त्याचे विविध घटक स्पष्ट करा.

२. व्यावसायिक पर्यावरणाचे महत्व स्पष्ट करा.

३. व्यावसायिक पर्यावरणाचे अंतर्गत घटक विशद करा.

४. व्यावसायिक पर्यावरणाचे बहिर्गत घटक स्पष्ट करा.

.....